# "बौद्धिक संपदा हक्क आणि भारतीय संदर्भात महत्व"

प्रा. मोरेश्वर काशिनाथ मडावी
संचालक, शारीरिक शिक्षण व क्रिडा विभाग
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय, कोंढा-कोसरा
ता. पवनी जिः भंडारा
Email : moreshmadavi 83@gmail.com

==========================================================================

## सारांश:

"बौद्धिक संपदा हक्क आणि भारतीय संदर्भात् महत्व" या शर्षकाच्या प्रस्तुत शोधनिबंधामध्ये बौद्धिक संपदेच्या हक्काचा परिचय, महत्व आणि आवश्यकतेचा वर्णन केलेला आहे. याबरोबर बौद्धिक संपदा हक्कांच्या अंतर्गत येणाऱ्या विवीध प्रकाराच्या क्षेत्राला विविध विभागात विभागलेला आहे. मानसाला त्याच्या बौध्दिक सृजनशिलतेची सुरक्षा पुरविण्याचा हक्क देणे यालाच बौध्दिक संपदा हक्क असे संबोधतात. असे समजले जाते की, जर एखादी व्यक्ती कोणत्या प्रकारचा बौध्दिक सृजन (जसे साहित्याची रचना, कृतीची रचना, शोध, अविष्कार इत्यादी) करतो तर सर्वप्रथम त्यावर त्याच व्यक्तीचा एकमात्र अधिकार असायला पाहिजे कारण हे हक्क बौध्दिक सृजनतेला दिलेले आहेत. बौद्धिक संपदा हक्कामुळे निर्माणकर्त्याच्या सृजनशिलतेचा अनधिकृतरित्या वापर, नकल (कॉपी) आणि चोरीपासून सुरक्षा करते बौद्धिक संपदा हक्क अज्ञानतेमुळे व अकार्यक्षम अशा अमलबजावणीमुळे देशाच्या तांत्रिक, आर्थिक आणि समाजाच्या विकासाकरिता घातक ठरु शकते. त्यामुळे या हक्काविषयी ज्ञानाचा प्रसार करुन, योग्य ती अमलबजावणी कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यावश्क आहे.

**बिज शब्दः** बौद्धिक, संपदा, हक्क, पेटंट, कॉपीराइट, IPR, □□ □□□, कायदा

## प्रस्तावना:

आधुनिक ज्ञानावर आधारित असलेल्या व्यवस्थेमध्ये बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Right's) नाविन्यता, सृजनशिलतेचा आणि आर्थिक विकास करण्याचा एक प्रमुख आधार मानल्या जाते बौद्धिक संपदा म्हणजे मानवी मेंदूच्या कल्पकतेतून निर्माण झालेली अद्भुत संपदा आहे. ज्यामध्ये साहित्यिक कला-कृती, व्यवसायी चिन्हे (Brand) डिझाइन्स, भौगोलिक निदेशांक (□□), शोधकार्य इत्यादीचे रक्षण करून निर्माण कर्त्याला प्रोत्साहित करण्याची एक व्यवस्था आहे. ज्यामुळे विश्वातील जणतेला सेवा व उत्पादन उपभोगायला मिळतात. जगात विश्व बौद्धिक संघटना (WIPO) आणि बौध्दिक मालमत्ता हक्काच्या व्यापार संबंधित करार (FIRP (TIRIPS) या द्वारे बौद्धिक संपदा हक्काचे (IPR) मानक ठरविले आहेत. इ.स २०१४

मध्ये जागतिक पेटंट अर्जात एकूण ३.७ दशलक्ष अर्ज केले गेले असून त्या पेटंट अर्जात भारत देशचा अतिशय मोलाचा वाटा आहे भारताच्या अर्जदारांनी १९.१०% इतकी मोठी अर्जात वाढ केली होती. ज्यासाठी भारत हा जागतिक स्तरावर सहाव्या क्रमांकाचा पेटंट फाइलिंग देश ठरला. डिझाइनच्या फाइलिंग मध्ये सुद्धा एकूण ४४.९०% ने वृद्धि झाली होती त्यामुळे भारतिय संदर्भात बौद्धिक संपदा हक्काचे महत्व अधिकच वाढलेले आहेत. राष्ट्रीय बौद्धिक संपदा हक्क धोरण २०१६ नुसार "Creative India, Innovative India" हा विचार भारताने स्विकारला पारंपारिक ज्ञान, PR स्टार्ट अपप्स, वैद्यकिय साफ्टवेअर इत्यादीच्या ज्ञानाचे रक्षण करण्याकरिता अगत्याने आहे. हा शोधनिबंध बौतिक संपदा हक्काचा परिचय, कायदे, धोरणे, त्याचे महत्व अडचणी आणि उपायोजनांवर प्रकाश टाकतो.

## महत्व :

१) विद्यार्थ्याकरिता उपयोगी :-

शाळेतील किंवा महाविद्यालयातिल विद्यार्थी वर्गाला भाषण, वादविवाद स्पर्धा सेमिनार, प्रकल्प, निबंध इत्यादी कामासाठी मदत करतो.

२) लोकांना माहीती अवगत होतेः

भारतातील बहुतेक जनतेला बौध्दिक संपदा हक्क (IPR) काय असते ढेच माहित नाही, ते अनभिज्ञ आहेत, त्यामुळे हा शोधनिबंध बौध्दिक कल्पना, शोध, साहित्य कसे वाचविता येतील हे समजते.

३) देश प्रगती आणि पैसा मिळवेल :

आपल्या देशातील बौद्धिक संपदा चांगल्या किंवा उच्च दर्जाची असेल तर, परकीय थेट गुंतवणूक (FDI) च्या माध्यमाने विदेशातून सुद्धा आपल्या देशात भरपूर प्रमाणात पैसा आणला जाऊ शकतो. याच्या माध्यमातून नव-नविन रोजगाराची संधी उपलब्ध होन्यास मदत होते. त्याचबरोबर भारतातील निर्यातीला नवी चालना मिळून शेती, औषध, आय.टी इत्यादी विविध क्षेत्रात अग्रेसर होता येते.

४) संस्कृती व परंपरा वाचविणे :

बौद्धिक संपदा हक्क पारंपारिक कलात्मक ज्ञान किंवा सांस्कृतिक वारसा जसे कोल्हापूरी चप्पल, नागपूरी संत्रा, भिवापूरी मिरची बनारसी साडी इत्यादी चोरीला जाव्यापासून रोखता येते व त्या मुळे निर्माता किंवा मालकाला त्याच्या ज्ञानाचा अधिकार सुरक्षित करता येऊ शकतो.

## उदिदष्टे :

१) बौद्धिक संपदा हक्काची ओळख करणे.

२) बौद्धिक संपदा हक्कांचे प्रकार कोणते आहेत ते ज्ञात करने.

३) बौद्धिक संपदा हक्कांच्या संदर्भात भारताची काय भुमिका आहे ते स्पष्ट करणे.

४) भारताचा अर्थिक विकास, परकिय थेट गुंतवणूक (FDI) इत्यादी करिता बौद्धिक संपदा हक्काचे महत्व काय आहेत ते ओळखणे.

५) बौद्धिक संपदा हक्काला येणाऱ्या अडचणी आणि सिफारसी नमूद करणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक आणि विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून डेटा संकलनासनि प्राथमिक आणि दुय्यम स्रोत वापरण्यात आलेले आहे

## बौद्धिक संपदा परिचय (Intr□duction):

बौखिक संपदा (IP) मानसाने त्याच्या बुद्धि चातुर्याने कल्पना व कौशल्य करून मेहनतीने निर्माण केलेली अमूर्त अशी मालमत्ता होय.

## बौद्धिक संपदा अधिकार (IPR)

बौद्धिक संपदा अधिकार हे मानसाने स्वताची बुद्धि, कल्पना व मेहनत करुन निर्मित केलेला वस्तूवर किंवा गोष्टीवर कायदेशिररित्या हक्क आहे, याच बुद्धिच्या मालमत्तेवर इत्तर दुसरे कुणीही तुमच्या परवानगी शिवाय आपले हक्क सांगू शकत नाही किंवा त्या वस्तूचा उपयोग करून आर्थिक लाभ मिळवून पैसा कमवू शकत नाही.

## भारतात बौध्दिक संपत्ती हक्कांचा विकास

सन भारतामध्ये बौद्धिक संपत्ती हक्काचा विकास स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजे ब्रिटिश राजवटीमध्ये झाला होता सुरु झाला होता. ब्रीटिश काळामध्ये सन १८५६ च्या पहिल्या पेटंट कायदयाने सुरुवात झाली. भारतामध्ये त्यानंतर हळूहळू १९११ या डिझाइन कायदा, कॉपीपीराईट कायदा १९५७ आणि १९५८ ला ट्रेडमार्क कायदा आला व नविन पेटंट कायदा सुधारित १९७० प्रश्ने लागू करण्यात आला होता. जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization) यांच्या "बौद्धिक संपदा हक्काचे व्यापीरासंबधी पहलू (Trade-Related Aspects of Intellectual Property. Rights) नावाच्या करारामुळे पेटंटच्या संरक्षणात वाढ झाली. त्यानंतर २०१६ च्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा हक्काच्या धोरणाने भारतातील जनतेत जागरुकता निर्माण झाली. लोकांना हळूहळू योग्य व हवे असलेले मार्गदर्शन मिळू लागले, प्रशिक्षण मिळायला सुरुवात झाली आणि परिवर्तनावर अधिकच भर देण्यात आल्याने बौद्धिक संपदा हक्काचा विकास सुरु झाला.

## संविधानिक मर्यादा :

पेटंट कायदा १९७० : भारतामध्ये या पेटंट कायद्यामुळे नविन शोधकर्त्याला किंवा शोधाकरिता (Inventions) संविधानिकपणे संरक्षण देणारा कायदा हा सन १९७२ मध्ये अमलात आणल्या गेला व एकूणच २० वर्षाचे संरक्षण देण्यात आले.

कॉपीराइट कायदा १९५७ : भारतामध्ये एखादया व्यक्तीने स्वतःच्या मेंदूने निर्माण केलेल्या मूळ कला-कृतीवर जसे गाणे, पुस्तके, सिनेमे, चित्रकला, ग्रंथ साहित्य इत्यादी कलेला पूर्ण आयुष्य + ६० वर्षाचे संरक्षण मिळाले.

ट्रेडमार्क कायदा १९९९ (**Trademarks Act.**1999)

हा कायदा सन १९५८ च्या कायदयाला खारीज करून तयार करण्यात आले. या कायदयामध्ये भारतात व्यवसायातील लोगो, ब्रांड आणि चिन्हाचा अनधिकृतपणे वापर करण्यासाठी थांबवितो व मुळ मालकांचे अधिकार अबाधित ठेवतो. या कायदयानुसार त्या वस्तूला नुतनीकरणासोबतच एकूण १० वर्षाचे संरक्षण मिळाले.

**GI** कायदा १९९९ (वस्तूंचे भौगोलिक संकेत)

या कायदयामुळे भारतातील विविध व विशिष्ट अशा भौगोलिक क्षेत्रातून कृषी उत्पादने व नैसर्गिक उत्पादने इत्यादीचे गैरमार्गाने वापर टाळने व त्या उत्पादन कर्त्याचे हक्क सुरक्षित राखणे असा आहे. ज्यामध्ये नागपूरी सत्रा, दार्जिलिंग चहा, गिनौर सफरचंद इत्यादी स्थानिक उत्पादन करणाऱ्या मुळ मालकांना संरक्षण मिळते.

भारतीय संदर्भात बौद्धिक संपदा हक्काचे महत्व :

भारतीय संदर्भात बौद्धिक संपदा हक्क (IPR) म्हणजे एखाद्या माणसाने बुद्धिमत्तेने तयार केलेल्या वस्तूवर किंवा शोधकार्यावर मिळालेला सनदशीर हक्क होय, या अधिकाराचे किंवा हक्काचे महत्व फोर मोठे आहे त्यामुळे भारतीय लोकांना नव-नविन कल्पनांना व शोधांना संरक्षण दिल्यामुळे नवीन रोजगारांची निर्मिती होऊन आर्थिक फायदा होतोच. परंतु या बहाल झालेल्या हक्कामुळे मूळ निर्मिणकर्त्याला आपली वस्तू चोरीला जाण्यापासून रक्षण करता येते, त्याचबरोबर शास्त्रज्ञ, कलाकार, व्यापारी इत्यादींना नफा मिळवून देण्यास मदत होते.

१) नव कल्पनेत वृद्धी:

बौद्धिक संपदा हक्क (IPR) च्या कायदयाने लघुउद्योजकांना, शास्त्रज्ञांना, संशोधकांना इत्यादी रचानाकारांना आपल्या वस्तू किंवा कला चोरीस जाण्याची भीती राहिली नसल्यामुळे ते नवीन उत्पादन, अनुसंधान निशंक राहुन करतात त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला हातभार लागतो.

२) रोजगार आणि निर्यात

बौद्धिक संपदा अधिकाराने भारतातील अनेक शेतकऱ्याना किंवा रचनाकारांना भौगोलिक निर्देशांक (□□) □□□ वापरुन कृषीचा माल किंवा इत्तर सेवा विदेशात विकून भरपूर नफा मिळविता येतो. व्याचबरोबर बेरोजगारी देशातील कमी करता येते.

३) आर्थिक विकासाला चालना

बौद्धिक संपदा हक्कामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना देते कारण हे हक्क त्या व्यवसायी वर्गाला बेकायदेशिर असणाऱ्या प्रतिस्पर्धाकापासून बचाव करतात तसेच रोजगार निर्मिती करुन निर्यातीला प्रोत्साहन मिळते. ज्या देशाचा बौधिक संपदा हक्क (IPR) व्यवस्था मजबूत नियोतीला प्रोत्साहन असलेले राष्ट्र व्यापारात अग्रेसर असतात, विदेशातील गुंतवणूकीलाही चालना देतात.

४) नकली मालापासुन सुरक्षा

आज जवळ-जवळ प्रत्येक वस्तूची नकली वस्तू बाजारात बघायला मिळते मोठमोठ्या शहरात, तुमच्या वस्तूच्या किंवा गावाच्या नाव देऊन तयार झालेली वस्तू बाजारात विकायला येते परंतू बौद्धिक संपदा हक्क (IPR) तुम्हाला भेटल्याने तुम्ही अशा नकली उत्पादनाला रोखण्यासाठी कोर्टात सुद्धा जाऊ शकता.

आव्हाने आणि समस्या

बौद्धिक संपदा हक्क (IPR) कायदा प्रत्यक्षरुपाने अमल करतांना अनेक विविध समस्या येतात. त्या अडचनी सोडविल्यासा हा कायदा योग्यरित्या अमलात आनता येऊ शकतो.

**१)** लोकांमध्ये जागरुकतेची कमतरता

लोकांना पेटंट काय असते, कॉपी राइट काय आहे. याबाबतीत पुरेशी माहीती नसते. यामध्ये ग्रामीण क्षेत्र मागासलेला आहे.

२) नोंदणी कार्यपद्धती वेळखाउ व किचकट

लोकांना एक पेटंट मिळविण्यासाठी अनेकदा ५ ते ६ वर्ष एवढा अवधी जातो, त्या प्रक्रियेला लागणारी फि जास्त असते, परवडणारी नसते, त्याचबरोबर त्यासाठी जास्त कागदपत्रांची मागणी केली जाते.

३) पायरसी (**Piracy)**

मुळ मालकाच्या किंवा निर्माणकर्त्याची परवानगी न घेताच त्याचा कॉपीराइट असणाऱ्या उत्पादनाचे कलेचे (उदा. गाणे, सिनेमे,पुस्तक) अनधिकृतपणे, वापर आणि वितरण करतात त्यामुळे मुळ निर्मात्या मालकाला फटका लागतो. परिणामी आर्थिक नुकसानही सहन करावा लागतो.

४) अमलबजावणीची कमी कमतरता

अनेक वेळा बौद्धिक संपदा हक्काची अमलबजावनी पाहिजे त्या वेगाने, हवी तशी होत नाही. बरेचदा कायद्यांना फक्त कायदवरच रहावे लागते. त्यामुळे निर्माणकर्ते निराश होतात नवनिर्मितीला प्रोत्साहन मिळत नाही.

उपाययोजना व शिफारसी

बौद्धिक संपदा हक्क (IPR) समस्या भारताला सोडविण्यासाठी शासनाला कायदेशिरपणे, धोरणात्मक प्रशासकियरित्या उपाययोजना करून हे हक्क मुळ मालकाला देता येऊ शकते.

१) कायदेशिर उपाय

बौद्धिक संपदा हक्क (IPR) च्या संदर्भात पर्यायाने वादविवाद मार्ग अवलंबून आलेली प्रकरणे सोडविता येतील (उदा. सल्लागार व मध्यस्त) यांना प्रकरणे किंवा खटले सोडवायला दिले तर न्यायालयातील प्रलंबित खटले सोडविण्यास वेळ कमी लागेल.

२) धोरणात्मक बदल

देशात राष्ट्रीय बौद्धिक संपदा हक्क (□□□ धोरण २०१६ नुसार जनतेमध्ये या विषयासंबंधी सतर्कता वाढविणे, नवीन कल्पना किंवा शोध कत्याला प्रोत्साहित करणे, कायदा मजबूत किंवा कडक करणे. पेटंट प्रक्रिया वेगाने सुरु करणे. व पेटेंट फि माफ करणे इत्यादी धोरणात्मक बदल केल्याने हक्क नवीन कल्पना, स्टार्टअप करणाऱ्याला चालना मिळेल.

३) प्रशासकिय सुधारणा

भारतात पेटंट कार्यालयामध्ये प्रशिक्षित अधिकाऱ्याची नेमणूक करुन्, अधिकारीक कठोर कार्यवाही - करुन येणारी संबंधित विषयाचे प्रकरणे वेळेत मार्गी लावल्यावर भर देणे. भारताच्या बौध्दिक संपदा हक्क (IPR) साठी खास किंवा वेगळ्या निधीची तरतूद करून शासनाला राज्य सरकारचा सहभाग करणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

बौद्धिक संपदा हक्क (IPR) मानवाच्या डोक्यातील मेंदूच्या संपत्तीचे रक्षक आहे. देशातील शहरात व गाव-खेड्यात कास्तकार वर्ग, काराागिर वर्ग युवक वर्ग इत्यादी काहीतरी नविन करण्याचा मानस ठेवुन नेहमिच हिरहिरीने प्रयत्नशिल राहतात. त्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कलाकृतिला जर का हे अधिकार अधिकार पदरात पडेले तर, भारत देशातील शहरी-ग्रामिण भाग बळकट होईल, नंतर राष्ट्रसुद्धा मजबुत होईल. हा कायदाच नव्हे तर श्रम संस्कृती आणि धन वाचविण्याचे उत्तम व प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे ज्ञानावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत भारताला नेतृत्त्व करता येईल.

## संदर्भग्रंथ

१) गोविलकर वि.म., बौद्धिक संपदा अधिकार', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०११ प्रस्तावनेतून.

३) गुर्जर सुभाष रा, संशोधन पद्धती आणि बौध्दिक संपदा अधिकार अर्थ व पब्लिकेशन्स, जळगाव, २०२५.

3) मिश्रा जे.पी. बौद्धिक संपदा अधिकार एक परिचय सेंट्रल लॉ पब्लिकेशन्स तृतिय आवृत्ती २०१३

४) बारड प्रदिप हिम्मतराव, बौद्धिक संपदा अधिकार जाणीव-जागृती अर्थव पब्लिकेशन्स जळगाव, प्रथमावृत्ती २०२३